राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी
जिल्हास्तरीय आरोग्य ओळखपत्र (हेल्थ कार्ड)
समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. रागांयो-१३१०/प्र.क्र. २७२/आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ ,
दिनांक :- २६ ऑगस्ट,२०१०

वाचा:- सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. रागांयो-२०१४/प्र.क्र.२०३/आरोग्य-६,
दि. २१ जून, २०१०

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यातील दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील कुटुंबांसाठी विमा कंपनीच्या सहभागाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर योजना पहिल्या टप्प्यामध्ये नांदेड,रायगड,सोलापूर,धुळे,अमरावती व गडचिरोली या सहा जिल्हयांमध्ये सुरु करण्यात येणार आहे.त्या अनुषंगाने या योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबास सदर कुटुबांचे एकत्रित छायाचित्र व बायोमेट्रिक तपशिल असलेले आरोग्य ओळख पत्र (हेल्थ कार्ड) देणे प्रस्तावित आहे. सदर आरोग्य ओळख पत्राचे प्रारुप तयार करणे, त्याची निर्मिती व वितरण करण्याबाबतचा निर्णय घेणे यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य ओळखपत्र समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीच्या दिनांक १५ जुलै,२०१० रोजी झालेल्या बैठकीमध्ये जिल्हास्तरावर आरोग्य ओळखपत्र तयार करणे व ते लाभार्थ्यांना वितरीत करण्याच्या संदर्भात आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर समितीचे गठन खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

जिल्हास्तरीय आरोग्य ओळख पत्र ( हेल्थ कार्ड) समिती

1. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
2. मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद - सहअध्यक्ष
3. जिल्हा शल्य चिकित्सक - सदस्य
4. जिल्हा पुरवठा अधिकारी - सदस्य
5. विमा कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी * - सदस्य
6. जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य सचिव

* शासनाने निवड केलेली विमा कंपनी

उपरोक्त नमूद सदस्यांव्यतिरिक्त सदर योजनेच्या कामकाजासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक वाटेल अशा अधिकाऱ्याची किंवा व्यक्तीची सदर समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना या द्वारे प्रदान करण्यात येत आहेत.

सदर आरोग्य ओळखपत्रे तयार करण्यासाठी संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी त्यांच्या यंत्रणेमार्फत ओळखपत्र तयार करणाऱ्या यंत्रणेस अद्यावत शिधा पत्रिकांबाबतची माहिती, इतर आवश्यक अभिलेख उपलब्ध करुन द्यावेत तसेच सदर माहिती तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग सुध्दा उपलब्ध करुन द्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ.सं. फडतरे )

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन, मुंबई

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई

मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई

अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, वित्त विभाग/ नियोजन विभाग/ विधी व न्याय विभाग / अन्न व नागरी पुरवठा विभाग/माहिती व तंत्रज्ञान विभाग/ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई

संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

जिल्हाधिकारी ,नांदेड,रायगड,सोलापूर,धुळे,अमरावती व गडचिरोली

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड,रायगड,सोलापूर,धुळे,अमरावती व गडचिरोली

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड,रायगड,सोलापूर,धुळे,अमरावती व गडचिरोली

जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड,रायगड,सोलापूर,धुळे,अमरावती व गडचिरोली

उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे , सर्व

जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड,रायगड,सोलापूर,धुळे,अमरावती व गडचिरोली

निवड नस्ती